महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७२ वे | दिनांक : १७/०६/२०२६ | वार : बुधवार


## शेतकरी व जमीनधारकांना मोठा दिलासा : जमिनीच्या कौटुंबिक वाटणीची मोजणी आता अवघ्या २०० रुपयांत



**मुंबई :** राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि जमीनधारकांना मोठा दिलासा देत राज्य सरकारने जमीन मोजणीच्या प्रक्रियेसंदर्भात एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे, आता कुटुंबातील जमिनीच्या वाटणीची मोजणी प्रति पोटहिस्सा अवघ्या २०० रुपयांत केली जाणार आहे. जमीन मोजणीच्या प्रक्रियेतील विलंब आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या उद्देशाने शासनाने हे नवे दर आणि कडक नियम लागू केले आहेत.

या नव्या नियमांनुसार भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळेचे कडक बंधन घालण्यात आले असून, आता 'नियमित मोजणी' ९० दिवसांत, तर 'द्रुतगती (फास्ट ट्रॅक) मोजणी' ३० दिवसांत पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. शासनाच्या या पारदर्शक आणि गतिमान निर्णयामुळे मोजणीसाठी महिनेन्महिने सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवणाऱ्या नागरिकांची ससेहोलपट थांबणार असून, त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहे.

**जमीन मोजणीचे नवे सुधारित दरपत्रक**

**राज्य सरकारने ग्रामीण आणि शहरी भागांतील जमिनीच्या क्षेत्रफळानुसार मोजणीच्या शुल्कात महत्त्वपूर्ण बदल केले असून, त्याचे नवीन दरपत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे:**

**कौटुंबिक वाटणी मोजणी:** आपापसातील संमतीने किंवा कोर्टाच्या आदेशाने होणाऱ्या कौटुंबिक जमीन वाटणीच्या मोजणीसाठी आता प्रति पोटहिस्सा केवळ २०० रुपये शुल्क आकारले जाईल.

**ग्रामीण भागातील मोजणी दर (२ हेक्टरपर्यंत):** नियमित मोजणी फी २००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी (३० दिवसांत) ८००० रुपये.

**शहरी भागातील मोजणी दर (१ हेक्टरपर्यंत):** नियमित मोजणीसाठी ३००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी १२००० रुपये.

**गुंठेवारी मोजणी:** 'महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमा'अंतर्गत येणाऱ्या भूखंडांच्या मोजणीसाठी ठरवून दिलेल्या नियमित दराच्या दीडपट शुल्क आकारण्यात येईल.

**मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास काय?**

**नवीन नियमावलीत अर्जदार आणि मोजणी अधिकारी या दोघांच्याही जबाबदाऱ्या आणि उत्तरदायित्वाबाबत स्पष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत:**

**अर्जदाराची गैरहजेरी आणि दंड:** निश्चित केलेल्या मोजणीच्या दिवशी जर अर्जदार स्वतः शेतावर गैरहजर राहिला, तर त्याला 'पुनर्भेट शुल्क' म्हणून मूळ फीच्या ५० टक्के किंवा कमाल १०,००० रुपयांपर्यंतचा दंड भरावा लागेल.

**भूमापक (अधिकारी) गैरहजर राहिल्यास सवलत:** जर ठरलेल्या तारखेला संबंधित सरकारी भूमापक किंवा अधिकारी अनुपस्थित राहिला, तर मात्र मोजणीच्या पुढील तारखेसाठी अर्जदाराला कोणतेही अतिरिक्त पुनर्भेट शुल्क द्यावे लागणार नाही.

**उच्चतपासणी फी (पुनर्तपासणी):** कनिष्ठ भूमापकाने केलेल्या मोजणीवर काही आक्षेप असल्यास, वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत त्याची पुन्हा तपासणी करण्यासाठी अर्जदाराला मूळ शुल्काच्या ३ ते ५ पट अधिक फी भरावी लागेल.

**सरकारी आणि निमशासकीय संस्थांना विशेष सवलत**

या नवीन धोरणांतर्गत जमीन मोजणीच्या दरांमध्ये सरकारी आणि निमशासकीय संस्थांना विशेष सवलत जाहीर करण्यात आली असून, आता निमशासकीय संस्थांना मोजणी दरात ५० टक्के, तर पूर्णतः शासकीय मालकीच्या जमिनीच्या मोजणीसाठी ७५ टक्के सवलत लागू राहणार आहे. या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णयामुळे महसूल विभागाच्या कारभारात मोठी पारदर्शकता येईल, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

## 'तुकाराम मुंढेंचे रक्त काढून सर्व खातेप्रमुखांना द्या' : माजी मंत्री सुबोध सावजी





**बुलढाणा :** तुकाराम मुंढे यांनी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून हा विभाग पूर्णपणे 'ॲक्शन मोड'मध्ये आला असून, गेल्या महिनाभरात अवैध गुटखा विक्रेते, अन्नपदार्थांत भेसळ करणारे, तसेच हॉटेल आणि मेडिकल व्यावसायिकांवर कारवाईचा धडाकाच लावण्यात आला आहे. मुंढे यांच्या या धडक कारवाईमुळे गैरप्रकार करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, त्यांच्या या धडाकेबाज कार्यशैलीचे राज्यभरातून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. याचाच प्रत्यय म्हणून काही शेतकऱ्यांनी चक्क त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालत कृतज्ञता व्यक्त केली. तर दुसरीकडे, राज्याच्या एका माजी मंत्र्यांनीही मुंढे यांच्या या कामगिरीचे अनोख्या शैलीत कौतुक करत आता एक वेगळीच मागणी केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील नेते आणि राज्याचे माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना पत्र पाठवून एक अत्यंत अनोखी आणि मार्मिक मागणी केली आहे. तुकाराम मुंढे यांच्या कठोर कारवाईमुळे सध्या राज्यातील भ्रष्टाचारी आणि भेसळखोरांचे धाबे दणाणले असून, त्यांच्याप्रमाणेच इतर सर्व खातेप्रमुखांनीही कर्तव्यदक्षतेने काम करावे अशी जनतेची अपेक्षा आहे. मात्र, प्रत्यक्षात तसे घडत नसल्याची खंत व्यक्त करत, इतर अधिकाऱ्यांमध्येही अशीच धडक कार्यक्षमता निर्माण व्हावी यासाठी चक्क 'तुकाराम मुंढे यांचे एक बाटली रक्त काढून ते आपणासह राज्यातील सर्व खातेप्रमुखांना थोडे-थोडे देण्यात यावे', अशी उपहासात्मक आणि हटके मागणी सुबोध सावजी यांनी या पत्राद्वारे केली आहे.

सुबोध सावजी म्हणाले, तुकाराम मुंढे यांचे एक बाटली रक्त काढून ते थोडे थोडे आपणांसह राज्यातील सर्व खाते प्रमुखांना द्यावे, जेणेकरून त्यांच्यासारखी काम करण्याची प्रेरणा व कार्यक्षमता निर्माण होऊन महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होईल. ज्याप्रमाणे अशक्त रुग्णाला रक्ताची बॉटल देऊन बरे करण्यात येत त्याचप्रमाणे तुकाराम मुंढे यांचे रक्त देऊन आपणासह सर्व राज्यातील खातेप्रमुखांना काम करण्याची शक्ती मिळेल.

अशक्त रुग्णाला सशक्त रुग्णाचे रक्त देऊन बरे करण्यात येते. त्यामुळे, तुकाराम मुंढेंचं रक्त राज्यातील सर्वच शासकीय प्रमुखांना द्यावं, म्हणजे तुकाराम मुंढेसारखं काम करण्याची प्रेरणा आणि शक्ती राज्यातील सर्वच विभागाच्या खातेप्रमुखांना मिळेल, असेही सुबोध सावजी यांनी म्हटले आहे.

## महायुतीतील वादावर पडदा! एकही मत फुटता कामा नये, एकनाथ शिंदेंचा शंभुराज देसाईंना आदेश

**सातारा :** राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या सातारा-सांगली स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील अंतर्गत धुसफूस अखेर संपुष्टात आली आहे. शिवसेनेचे सर्व मतदार महायुतीचे अधिकृत उमेदवार धैर्यशील कदम यांनाच मतदान करणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. "शिवसेनेचे एकही मत फुटू नये आणि प्रत्येक मत महायुतीच्या उमेदवाराच्याच पारड्यात पडले पाहिजे," असे थेट आणि कडक आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांना दिले आहेत. या आदेशामुळे महायुतीच्या गोटात पसरलेला संभ्रम आता दूर झाला आहे.

सातारा-सांगली विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीतर्फे भाजपचे धैर्यशील कदम आणि महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अभयसिंह जगताप यांच्यात थेट लढत होत आहे. ही जागा भाजपच्या वाट्याला गेल्याने त्यांनी धैर्यशील कदम यांना उमेदवारी दिली. मात्र, स्थानिक पातळीवर शिवसेना आणि भाजपमध्ये प्रचंड दरी निर्माण झाल्यामुळे, सुरुवातीला शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांनी आणि मतदारांनी कदम यांच्या प्रचारापासून काहीशी दूर राखली होती. त्यामुळे महायुतीच्या उमेदवाराची धाकधूक वाढली होती.

स्थानिक पातळीवरील हा वाद वाढत असल्याचे पाहून, शंभूराज देसाई यांनी सातारा आणि सांगलीतील शिवसेनेच्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेतील मतदारांची (लोकप्रतिनिधींची) एक विशेष बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी सर्व नगरसेवक आणि सदस्यांची मते जाणून घेतली आणि त्याचा सविस्तर अहवाल पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवला. "एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील, तो आम्हाला शिरसावंद्य असेल," अशी भूमिका देसाई यांनी घेतली होती.

अखेर, निवडणुकीत कोणताही दगाफटका होऊ नये म्हणून एकनाथ शिंदे यांनी शंभूराज देसाई यांच्याकडे स्पष्ट निरोप पाठवला आहे. शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींनी 'महायुती धर्म' पाळावा आणि सर्वच्या सर्व मते धैर्यशील कदम यांनाच द्यावीत, असे आदेश मिळाल्यामुळे सातारा-सांगलीत महायुतीचे संकट तूर्तास टळले आहे.

दरम्यान, या दोन्ही मित्रपक्षांमधील वादाची पाळेमुळे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडे स्पष्ट बहुमत असतानाही, भाजपने दोन्ही पक्षांची काही मते फोडून स्वतःचा उमेदवार निवडून आणला होता. या निवडणुकीदरम्यान झालेल्या तीव्र राजकीय राड्यात मंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांची पोलिसांशी मोठी झटापट झाली होती. या प्रकारामुळे पालकमंत्री शंभूराज देसाई भाजपवर कमालीचे नाराज होते. भाजपच्या या 'कावेबाज' खेळीचा वचपा शिवसेना विधानपरिषद निवडणुकीत काढणार, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती.




## गोरीला

गोरीला माकड
संपूर्ण शाकाहारी
फळं, पानं, बांबूची
करतो सकाळी न्याहारी

रंगाने काळा काळा
चपटे त्याचे नाक
डुलत डुलत चालतो
कंबरेत थोडा बाक

खुशीत आला की मारतो
लांब लांब उड्या
भीतीदायक चेहरा
मोठ्या नाकपुड्या

सांकेतिक भाषेचे
असते त्याला ज्ञान
स्वभावाने भावनिक
शांत व बुद्धीमान

दिसतो अक्राळविक्राळ
वाटते त्याची भीती
प्रेम त्याला दिल्यास
जपतो माणुसकीची नाती



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ

## मृग सरला सरला!

आता येरे मेघराजा,
मृग सरला सरला.
कुठे जाऊन बसला,
नाही अजून उठला. १

शेतामध्ये माझा बाप,
पाहतोय तुझी वाट.
यावे लवकर आता,
घेऊनिया तू रे लाट. २

भेगाळली शेतीमाती,
असे कसे तू कोपला.
असा निष्ठूर होऊनी,
कुठे जाऊन झोपला. ३

तुझे अवेळी लपणे,
आहे न्याय रे कसला.
नको नको करू असे,
बाप निराश बसला. ४

दिसं पेरणीचे आले,
नाही तुला कसे पत्ता.
आता तुलाही देईन,
माझ्या कष्टातून भत्ता. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# मोकाट फिरणाऱ्या आरोपींच्या अटकेसाठी आमरण उपोषण




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील तुगाव(येणेगुर) येथील एका दलित कुटुंबातील पीडित भालचंद्र चोखोबा कांबळे याला जातीयवादी गुंडांनी जेवायला घेऊन जातो म्हणून आरोपी रोहित जोमदे याच्या शेतात द्राक्षाच्या बागेत नेऊन खांबाला दोन्ही हात बांधून लाथा, बुक्क्या आणि बेल्ट व रॉडने बेदम मारहाण करत महारड्या दोन दोन जयंती काढता , तुम्हाला खूप माज आलाय, आम्हाला ओळखतो का आम्ही कोण आहोत असे म्हणत पशुपेक्षा हीन वागवत अत्यंत हिंस्त्र पद्धतीने हल्ला केला. यात भालचंद्र कांबळे हा गंभीररित्या जखमी झाला असून त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते. आरोपी रोहित दीपक जोमदे, पंकज शंकर जोमदे, महेश गहिनीनाथ जोमदे, चाँद फकीर यांपैकी चांद फकीर याला मुरूम पोलिसांनी तत्काळ अटक केली असून चौघांविरोधात अँस्ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत मुरूम पोलिस ठाण्या अंतर्गत गुन्हा दाखल केला असून बाकी तीन आरोपी फरार आहेत.गुन्हा घडून अनेक दिवस झाले तरी आरोपीचा पत्ता कसा काय लागत नाही,त्यांना कुणाचे राजकीय अभय आहे,संबंधित आरोपी शिवसेना शिंदे गटाशी संबधित असून पोलिसांवर कोणाचा राजकीय दबाव आहे काय असा संतप्त सवाल केला नागरिकांतून केला जात आहे. यापूर्वीही तुगाव गावात या बेशिस्त आणि बेताल सुटलेल्या नराधमांनी अनेकाना विनाकारण मारहाण करत आपली दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला आहे.सदरील प्रकरणात अठरा मे रोजी गुन्हा घडला असून अजूनपर्यंत आरोपी सापडत नाहीत त्यामुळे संबंधित कुटुंबाची सहनशीलता संपत चालली असून विविध सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ते भालचंद्र कांबळे कुटुंबाला आधार देण्यासाठी विविध भागातून येत आहेत.यासंदर्भात ११ मे रोजी मुरूम पोलिस स्टेशन मध्ये अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये रीतसर गुन्हा नोंद होऊनही आज इतके दिवस होत आहे तरी गुन्हेगार कसे काय सापडत नाही असा संतप्त सवाल करत यापूर्वी उमरगा येथील तहसील कार्यालय व मुख्य हमरस्ता येथे रोको आंदोलन ही करण्यात आले होते.आंदोलक अतिशय आक्रमक झाले असता स्वतः तहसीलदार साहेबांनी निवेदन स्वीकारत आरोपींना आठ दिवसात अटक करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. आज पर्यंत महिना उलटून गेला तरी आरोपींना अटक नाही त्यामुळे पुन्हा उपविभागीय अधिकाऱ्यांना आमरण उपोषणाचे निवेदन देऊन, कालपासून उल्हास भोसले,नागेश भोसले,भालचंद्र कांबळे,निलेश कांबळे,बाळू कांबळे,मुकेश कांबळे यांनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. उपोषणस्थळी अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पुढारी भेट देत असून काल रात्री उशिरापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार दोन आरोपी अनुक्रमे रोहित जोमदे व पंकज जोमदे याला अटक करण्यात आली असून अजून मुख्य आरोपी महेश जोमदे हा अद्याप फरारी असल्याचे सांगण्यात आले.पीडित कुटुंबाचा आरोप आहे की मुख्य आरोपी पोलिसांच्या संपर्कात असून पोलिस जाणीवपूर्वक वेळकाढू धोरण स्वीकारत आहेत त्यामुळे जोपर्यंत मुख्य आरोपी महेश गहिनीनाथ जोमदे याला अटक होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण अविरतपणे चालू राहील असा विश्वास बोलून दाखवत पीडित कुटुंब शेवटच्या श्वासापर्यंत उपोषण चालूच राहील असा निर्धार व्यक्त केला आहे.

त्यामुळे प्रकरणाची गांभीर्याने दाखल घेऊन तत्काळ मुख्य आरोपीस अटक न केल्यास समकक्ष जिल्हाधिकारी व विभागीय पोलिस आयुक्तालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.सदर निवेदनावर तुगाव येथील अनेक नागरिक आणि महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तिफणकार..

कवी, लेखक, साक्षेपी संपादक
असंख्य अक्षर मनं तयार केलीतं
आपल्या तिफण वावराच्या
बांधा बंधुऱ्यावर अन् गाडी बैलांच्या धुऱ्यावर..
सन्मान केलात नितळ श्रध्देय
मनाने सुखनेच्या कटी खांद्यावर घेऊन.. अन् दिलात दिलदार मनाने
*तिफण पुरस्कार*
ज्याचा लौकिक झाला महाराष्ट्रभर...तिफण चालते आहे अंखड
साधनेचं वृत्त घेऊन..
अन् मायमातीची मुठभर माती
ओंजळीत पेरलीस अन् अंकूरले नवे तिफणीचे मौतीक हार... अनेक
अनभिज्ञ वाटसरू च्या स्वप्न पंखात उब दिलीस..
मराठी चे दिग्गज अक्षरपाने आणलीत आपण तिफण मंचावर सुखना
नदीचं देशगव्हाण अन् कन्नड तालुका म्हणजे तिफण साहित्यक
चळवळीचे अग्रस्थानी राहिलेले उर्जा केंद्र आहे... तिफण अंकाच्या
मुलपृष्ठावर मज शब्द पामराला आपण झोका दिला..
मी हे शब्दातीत ऋण कायमचं हृदयीस्थानी जतन करतो आहे.
आपल्या सृजनशील स्नेहाळू भावनेचा आदर आहेच कायम..
अतिशय उत्तम आशय संपन्न आजचे वर्तमान नांगरून
नव विचारांची पेरणी करताहेत
हा अवधा माळरान आपण हिरवा केला आहे...
तुम्ही पेरत रहा दानादाना..
आपले कोणतेच हंगाम वाया जाणार नाही..
आपण सच्चे किसानपूत्र आहात
म्हणूनच लोकमानसात
तिफणकार हे नाव
कायमचे कोरले गेले आहे.

**प्रभाकर शेळके,**
**जालना**


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ जून २०२६


## श्री आजुबाई माध्यमिक विद्यालय व कर्मवीर काकासाहेब देशमुख उच्च माध्यमिक विद्यालयात उत्साहात 'प्रवेशोत्सव' संपन्न



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** कन्नड तालुक्यातील शांतीनगर येथील श्री आजुबाई माध्यमिक विद्यालय व कर्मवीर काकासाहेब देशमुख उच्च माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत अत्यंत उत्साहात आणि चैतन्यापूर्ण वातावरणात करण्यात आले. १५ जून २०२६ रोजी आयोजित या 'प्रवेशोत्सव' कार्यक्रमामुळे शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने पुन्हा एकदा दुमदुमून गेला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मान्यवरांच्या वतीने शाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. नवीन वर्गात प्रवेश मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद ओसंडून वाहत होता. "विद्यार्थी हे राष्ट्राचे भविष्य आहेत. शालेय जीवनात केवळ पुस्तकी ज्ञान न मिळवता, शिस्त, संस्कार आणि अभ्यासू वृत्ती जोपासणे गरजेचे आहे. आपल्या शाळेने नेहमीच गुणवत्तेला प्राधान्य दिले असून, या शैक्षणिक वर्षातही विद्यार्थी विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करतील, असा विश्वास वाटतो."विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असून, विविध उपक्रम, क्रीडा स्पर्धा आणि तांत्रिक शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना घडविण्याचा आमचा मानस आहे. तसेच, पालकांना आवाहन आहे की, त्यांनी आपल्या पाल्यांना नियमित शाळेत पाठवून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सक्रिय सहभाग नोंदवावा.या प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेने प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ केली असून, १ली ते १२ वी पर्यंतच्या वर्गांसाठी प्रवेश सुरू आहेत. पालकांनी आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी लवकरात लवकर शाळेत संपर्क साधावा.याप्रसंगी नगरसेवक दीपक जी ताठे, श्री आजुबाई शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री सुधाकर देवकर सर, मुख्याध्यापिका श्रीमती वंदना देशमुख मॅडम, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयात विनामूल्य समुपदेशन व करिअर मार्गदर्शन केंद्र सुरू




**कन्नड :** येथील शिवाजी महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन व करिअर मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील प्रवेश, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा, करिअरच्या संधी तसेच अभ्यासक्रम आणि विषय निवडीबाबत मार्गदर्शन केले जाते.महत्त्वाची बाब म्हणजे या केंद्राची सेवा पूर्णपणे विनामूल्य आहे. आतापर्यंत करिअर आणि प्रवेशासंदर्भात या केंद्राचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी केंद्राचे समन्वयक व मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. एम. घोती यांच्याशी ७५०७२६२००३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.






## नियमित प्राचार्यपदी डॉ. गुलाब राठोड



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाचे नियमित प्राचार्य म्हणून प्रा. डॉ. गुलाब राठोड यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. गेली दोन वर्ष ते कार्यकारी प्राचार्य म्हणून काम पाहत होते.गेल्या दोन वर्षात एक कुशल प्रशासक म्हणून त्यांनी प्रशासनावर आपली छाप सोडली.त्यांची कार्यकुशलता व शैक्षणिक क्षेत्रात नवे नवे प्रयोग आणि विद्यार्थिनुरूप वातावरण निर्माण करून , विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. सर्वांच्या मताचा आदर त्याचबरोबर सर्वसमावेशकता हाच नेतृत्वगुण त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष धागा आहे. या त्यांच्या कार्याचा आणि नियुक्तीचा गौरव करण्यासाठी आज श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदर पतंगे काका आणि संचालक मंडळातील सन्माननीय सदस्य यांच्या वतीने विशेष सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी जबाबदारी सोबतच आपल्या सर्व शैक्षणिक क्षेत्रातील अलक्षित आकांक्षाची परिपूर्ती करण्याचे आश्वासन देऊन आपण या प्रवासात सर्वजण माझ्यासोबत आहेत याचे समाधान अपूर्व आहे आणि ते कायम राहील याची मला खात्री असल्याचे सांगितले.

आपली संस्था ही स्वातंत्र्यपूर्व काळातील एक नावाजलेली संस्था असून तिला एक दैदिप्यमान इतिहास आहे. तीचे पावित्र्य आणि प्रतिष्ठा जपणे माझ्यासोबत आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असे सांगितले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ जून २०२६


# महाराणा प्रताप : राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक



भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि योद्धे होऊन गेले. काहींनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर मोठी साम्राज्ये उभी केली, तर काहींनी प्रशासन, संस्कृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिद्ध केले. परंतु केवळ पराक्रमामुळे नव्हे, तर स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम आणि अदम्य जिद्दीमुळे जनमानसात अजरामर ठरलेले व्यक्तिमत्व म्हणजे महाराणा प्रताप. भारतीय संस्कृतीत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांची परंपरा आहे. या परंपरेतील तेजस्वी नाव म्हणून महाराणा प्रताप यांचा उल्लेख केला जातो. मेवाडच्या या महान राजाने कोणत्याही प्रकारच्या परकीय अधिपत्यापुढे झुकण्यास नकार दिला आणि जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यामुळेच आजही त्यांचे जीवनचरित्र प्रेरणेचा अखंड झरा मानले जाते.भारतातील अनेक भागांत तिथीनुसार महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा १७ जून रोजी तिथीनुसार महाराणा प्रताप जयंती साजरी होत आहे. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा नसून स्वाभिमान, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पुनर्स्मरण करण्याचा आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म राजस्थानमधील कुंभलगड येथे झाला. त्यांचे वडील महाराणा उदयसिंह द्वितीय हे मेवाडचे शासक होते, तर माता जयवंता बाई यांनी प्रताप यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कारांची समृद्ध छाप उमटविली. बालपणापासूनच प्रताप यांच्यात निर्भयता, शौर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. तलवारबाजी, घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि युद्धकौशल्य यांचे शिक्षण त्यांनी अत्यंत निष्ठेने घेतले. राजपुत्र म्हणून त्यांना राजवैभवाचा अनुभव मिळाला; परंतु पुढील आयुष्यात त्यांनी वनवास, दारिद्र्य आणि संघर्ष यांचाही तितक्याच धैर्याने स्वीकार केला.सोळाव्या शतकातील भारताच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता मुघल साम्राज्याचा विस्तार वेगाने होत होता. सम्राट अकबराने विविध राजपूत संस्थानांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजपूत राजांनी मुघल अधिपत्य स्वीकारले; परंतु मेवाडचे स्वातंत्र्य टिकविण्याचा निर्धार महाराणा प्रताप यांनी केला. मेवाड हा केवळ एक प्रदेश नव्हता, तर तो राजपूत स्वाभिमानाचे प्रतीक होता. त्यामुळे मेवाडच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणे प्रताप यांना मान्य नव्हते.इ.स. १५७२ मध्ये महाराणा प्रताप यांचा मेवाडच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. त्या वेळी मेवाड अनेक संकटांनी वेढलेला होता. चित्तौडगड आधीच मुघलांच्या ताब्यात गेला होता. राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत होती आणि अनेक भागांवर बाह्य दबाव होता. अशा कठीण परिस्थितीत प्रताप यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्यांनी आपल्या प्रजेचा विश्वास संपादन केला आणि मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करण्याचा संकल्प केला.अकबराने अनेक वेळा दूत पाठवून महाराणा प्रताप यांना मुघल अधिपत्य स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला. परंतु प्रताप यांनी स्वाभिमानाशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्यासाठी राज्यापेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे होते. ते म्हणत असत की परकीय अधीनतेत वैभवशाली जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना कष्ट सहन करणे अधिक श्रेष्ठ आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अग्रगण्य प्रेरणास्रोत ठरतात.महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वाधिक प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीची लढाई. १५७६ मध्ये मेवाड आणि मुघल सैन्य यांच्यात हळदीघाटी येथे भीषण युद्ध झाले. मुघल सैन्याचे नेतृत्व आमेरचे राजा मानसिंह करत होते, तर महाराणा प्रताप स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व करत होते. संख्येने मुघल सैन्य अधिक बलवान असले, तरी मेवाडच्या सैनिकांनी अद्भुत शौर्याचे दर्शन घडविले. या युद्धात महाराणा प्रताप यांचा प्रिय घोडा चेतक याने दाखविलेली निष्ठा आणि पराक्रम आजही लोककथांचा विषय आहे.चेतक हा केवळ घोडा नव्हता, तर महाराणांचा विश्वासू सहकारी होता. युद्धादरम्यान गंभीर जखमी होऊनही त्याने महाराणांना सुरक्षित स्थळी पोहोचविले. अखेरीस त्याचा मृत्यू झाला. चेतकाच्या निष्ठेची कथा भारतीय जनमानसात आजही भावनिक आदराने सांगितली जाते. महाराणा प्रताप आणि चेतक यांचे नाते हे माणूस आणि प्राणी यांच्यातील स्नेह, विश्वास आणि समर्पणाचे अद्वितीय उदाहरण मानले जाते.हळदीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे संघर्षमय जीवन अधिक कठीण बनले. त्यांनी अरवली पर्वतरांगांमध्ये आश्रय घेतला. कुटुंबासह त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. दंतकथांनुसार त्यांच्या कुटुंबाला अनेकदा उपासमारीची वेळ आली. जंगलात राहून त्यांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ज्योत कायम ठेवली. संकटांनी खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने सैन्य संघटित केले आणि गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रभावी वापर केला.महाराणा प्रताप यांच्या संघर्षात भामाशाह यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भामाशाह हे महाराणांचे विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपली संपत्तीचा मोठा भाग महाराणा प्रताप यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केला. या आर्थिक मदतीमुळे महाराणांना सैन्याची पुनर्बांधणी करता आली. राष्ट्रहितासाठी संपत्तीचा त्याग करण्याची प्रेरणा भामाशाह यांच्या उदाहरणातून मिळते.महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले प्रशासकही होते. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. शेती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. जंगलांमध्ये आणि डोंगराळ भागातही प्रशासन प्रभावीपणे चालविण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती.त्यांच्या राज्यकारभारातील एक महत्त्वाचे पैलू म्हणजे सर्वधर्मसमभाव. महाराणा प्रताप यांनी विविध समाजघटकांना आपल्या संघर्षात सहभागी करून घेतले. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांतील लोक होते. हकीम खान सूर यांच्यासारख्या मुस्लिम योद्ध्यांनीही मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केले. यावरून महाराणा प्रताप यांची राष्ट्रकल्पना ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होती, हे स्पष्ट होते.महाराणा प्रताप यांच्या जीवनातून आत्मसन्मानाचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या भौतिकवादी युगात अनेकदा तत्त्वांशी तडजोड करण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा वेळी प्रताप यांचे जीवन आपल्याला मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी संकटांना घाबरून माघार घेतली नाही. अपयश आले तरी संघर्ष सोडला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जिद्द आणि चिकाटी आजच्या तरुण पिढीसाठी विशेष मार्गदर्शक ठरते.इतिहासात अनेकदा युद्धांच्या निकालावरून व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन केले जाते; परंतु महाराणा प्रताप यांच्या बाबतीत तसे घडत नाही. हळदीघाटीच्या युद्धात निर्णायक विजय मिळाला नसला, तरी त्यांनी स्वातंत्र्याचा लढा अखंड सुरू ठेवला. पुढील काळात त्यांनी मेवाडमधील अनेक प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. चावंड येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली आणि राज्याची पुनर्बांधणी केली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन केवळ युद्धाच्या निकालावर नव्हे, तर त्यांच्या अटळ संघर्षावर केले पाहिजे.महाराणा प्रताप यांच्या चरित्राचा प्रभाव साहित्य, लोककला आणि जनमानसावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. राजस्थानातील लोकगीतांमध्ये त्यांच्या शौर्याचे वर्णन आढळते. अनेक कवी, लेखक आणि इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. श्यामनारायण पांडे यांच्या 'हल्दीघाटी' या काव्यातून महाराणांच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे. विविध भाषांमधील साहित्यकृतींनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महाराणा प्रताप यांचे उदाहरण प्रेरणादायी मानले गेले. परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेतली. स्वराज्य, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची भावना जागृत करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा उल्लेख केला जात असे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज असते आणि महाराणा प्रताप हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे.आजच्या काळात महाराणा प्रताप जयंती साजरी करताना केवळ मिरवणुका, पुष्पहार आणि औपचारिक कार्यक्रम यापुरते मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा समाजजीवनात अंगीकार होणे आवश्यक आहे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होय. राष्ट्रभक्ती म्हणजे इतरांविषयी द्वेष नव्हे, तर देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची वृत्ती होय. त्याग म्हणजे केवळ भौतिक वस्तूंचा त्याग नव्हे, तर सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची तयारी होय. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून या मूल्यांचे शिक्षण मिळते.तरुण पिढीसमोर आज अनेक आव्हाने आहेत. स्पर्धात्मक जीवनशैली, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मूल्यांमधील बदल आणि करिअरची धडपड या सर्वांमध्ये आत्मविश्वास आणि नैतिकतेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत महाराणा प्रताप यांचे जीवन युवकांना प्रेरणा देऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयाप्रती निष्ठा राखणे, परिश्रम करण्यास तयार राहणे आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य बाळगणे ही शिकवण त्यांच्या चरित्रातून मिळते.राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महाराणा प्रताप यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध समाजघटकांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला. आज विविधतेने नटलेल्या भारताला सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि एकात्मतेची गरज आहे. मतभेद असले तरी राष्ट्रीय हित सर्वोच्च मानण्याची वृत्ती समाजात रुजली पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून ही प्रेरणा मिळते.इतिहासाचा अभ्यास करताना व्यक्तिपूजेला बळी पडणे योग्य नाही; परंतु महान व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडविणारा मार्गदर्शक असतो. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी धैर्य, आत्मविश्वास आणि मूल्यनिष्ठा यांच्या बळावर संकटांवर मात करता येते.महाराणा प्रताप यांचे निधन १५९७ मध्ये झाले. मृत्यूपूर्वीही त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्याची चिंता व्यक्त केली होती, असे सांगितले जाते. आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मातृभूमीप्रती निष्ठा कायम ठेवली. त्यांच्या पश्चातही त्यांच्या संघर्षाची परंपरा जिवंत राहिली. आज अनेक स्मारके, पुतळे आणि ऐतिहासिक स्थळे त्यांच्या स्मृती जागवितात; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण समाजाच्या चेतनेत कायम राहणे आवश्यक आहे.महाराणा प्रताप जयंती हा केवळ एका राजाचा जन्मदिन नाही, तर तो भारतीय स्वाभिमानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंचे स्मरण करून स्वतःला अधिक जबाबदार नागरिक बनविण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धैर्य, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रसेवा ही मूल्ये आपल्या आचरणात उतरली, तरच महाराणा प्रताप यांना खरी आदरांजली वाहिली जाईल.आज भारत प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि, या प्रगतीला नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. विकासासोबतच चारित्र्यनिर्मितीही महत्त्वाची आहे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी दाखवून दिले की भौतिक यशापेक्षा तत्त्वनिष्ठा अधिक मौल्यवान असते.महाराणा प्रताप यांचे चरित्र हे भारतीय संस्कृतीतील तेजस्वी अध्याय आहे. त्यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमान यांची गाथा पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा निर्धार करूया. कारण इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या आदर्शांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसून येते.महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, संसाधने कितीही मर्यादित असली, तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी अखंड प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य करता येतात. स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवणारा हा महान योद्धा भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करीत, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या महाराणा प्रताप जयंतीनिमित्त सर्वांना प्रेरणा, ऊर्जा आणि राष्ट्रसेवेची नवी दिशा लाभो, हीच कृतज्ञ भावना व्यक्त करावीशी वाटते.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल — bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ जून २०२६

## जिंतूर तहसील पुरवठा विभातून शासकीय कर्मचाऱ्यांना नियम बाह्य राशन वाटप

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर ) :** शहरात २४० शासकीय कर्मचाऱ्यांना स्वस्त धान्य वाटप होत असल्याच्या गंभीर आरोपाबत माहिती न दिल्याने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर अपिलार्थी प्रदीप कोकडवार यांच्या बाजूने निर्णय लागला आहे. तहसीलदार, जिंतूर यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना एका महिन्यात संपूर्ण माहिती मोफत देण्याचे आदेश दिले आहेत.

प्रकरण काय आहे? नागरिक प्रदीप सोपानराव कोकडवार यांनी १० नोव्हेंबर २०२५ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज दाखल केला होता. जिंतूर शहरातील पुरवठा विभागातून २४० शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय स्वस्त धान्य दुकानातून धान्य वाटप केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. या वाटपाची मंजुरी कोणी दिली, मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव-पद, किती कालावधीपासून वाटप चालू आहे आणि लाभार्थी कर्मचाऱ्यांची संपूर्ण यादी त्यांनी मागितली होती. ६० दिवस उलटूनही माहिती नाही - मूळ अर्जाला ३० दिवसांत उत्तर देणे बंधनकारक असताना ६० दिवस उलटूनही जन माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतीही माहिती मिळाली नाही. त्यामुळे कोकडवार यांनी ११ जानेवारी २०२६ रोजी माहितीचा अधिकार कायदा कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

अपिलात काय झाले? - १६ एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालयात झालेल्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, २४ ऑक्टोबर २०२५ रोजी २४० कर्मचाऱ्यांची यादी संबंधितांना दिली होती. मात्र अपिलार्थी कोकडवार यांनी आक्षेप घेतला की, मागितलेली संपूर्ण माहिती अद्याप मिळालेली नाही. तसेच लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली असल्यास त्याची कागदपत्रेही देण्यात आलेली नाहीत.

तहसीलदारांचा महत्त्वपूर्ण निर्णय - दोन्ही बाजू ऐकून प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी स्पष्ट आदेश दिले की, "अपिलार्थी यांना अद्याप माहिती दिलेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी एका महिन्याच्या कालावधीत सदरची माहिती विना मूल्य उपलब्ध करून द्यावी."

असा आदेश - अपील निर्णय दि १६जून रोजी प्राप्त झाला आहे. पुढील कारवाईकडे लक्ष - या निर्णयामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पद्धतीने स्वस्त धान्य मिळत असल्याच्या आरोपांची सत्यता आता समोर येण्याची शक्यता आहे. शासकीय कर्मचारी हे रेशन योजनेसाठी अपात्र असतात. १६ मे २०२६ पर्यंत माहिती न मिळाल्यास अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करू शकतात. अपील निर्णय दि १६जून रोजी प्राप्त झाला आहे

प्रतिक्रिया - "शासकीय कर्मचाऱ्यांना गरिबांसाठीच्या योजनेचा लाभ मिळत असेल तर ही गंभीर बाब आहे. पारदर्शकतेसाठी माहिती मिळणे आवश्यक आहे," असे अपिलार्थी प्रदीप कोकडवार यांनी सांगितले.

## शिवबा प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. विनोद सिनकर आणि मयूर साबळे यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** नवीन शैक्षणिक धोरणानुसार पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी समितीत निवड झालेल्या शहरातील शिक्षकांची शिवबा प्रतिष्ठानने यथोचित दखल घेतली. या शिक्षकांची निवड आणि उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष - ॲड. सुधाकर कापरे, सचिव - प्रा. एच.आर. चव्हाण यांच्या हस्ते श्री सरस्वती भुवन प्रशालेतील शिक्षक डॉ. विनोद सिनकर आणि मयूर साबळे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ.विनोद सिनकर यांनी इयत्ता तिसरी आणि चौथीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तक निर्मिती विषय समितीत उत्कृष्ट कार्य केले. श्री. मयूर साबळे यांनी इयत्ता सहावीच्या विज्ञान विषयाच्या पाठ्यपुस्तक निर्मितीत उत्कृष्ट कार्य केले आहे. या तीनही पाठ्यपुस्तकांची निर्मिती अतिशय उत्तम झाली असून त्यात वरील दोन्ही शिक्षकांचे महत्वाचे योगदान आहे.

या सत्कार प्रसंगी शिवबा प्रतिष्ठानचे सदस्य - प्रा. प्रसेनजित तायडे, राजेश राठोड, श्री स.भु. पतसंस्थेचे अध्यक्ष संजय कंटुले, श्रीवल्लभ जोशी आदी मंडळी उपस्थित होते.

## हंडी गावातील 'जलजीवन मिशन'चे काम रखडले; ऐन उन्हाळयात ग्रामस्थांचे पाण्यासाठी प्रचंड हाल!



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर ) :** जिंतूर तालुक्यातील हंडी गावामध्ये केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'जलजीवन मिशन' अंतर्गत सुरू असलेले पिण्याच्या पाण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत अर्धवट स्थितीत बंद पडले आहे. कंत्राटदाराच्या या अक्षम्य दिरंगाईमुळे ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत संपूर्ण हंडी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र भटकंती करावी लागत असून पाण्याचे प्रचंड हाल होत आहेत. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे तातडीने लक्ष वेधण्यासाठी हंडी येथील पत्रकार श्री. गणेश विठ्ठलराव पालवे यांनी ग्रामसेवक आणि सरपंच यांना लेखी निवेदन देऊन हे बंद पडलेले काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, हंडी गावातील प्रत्येक घराला नळाद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे या उद्देशाने जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठ्याची योजना मंजूर करण्यात आली होती. योजनेचे काम सुरुवातीला वेगाने सुरू झाले, मात्र गेल्या काही महिन्यांपासून संबंधित कंत्राटदाराने हे काम अचानक अर्धवट स्थितीत बंद करून ठेवले आहे. सध्या उन्हाचा पारा वाढलेला असताना व दैनंदिन जीवनात नागरिकांना आणि पशुधनाला पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. हक्काचे पाणी असूनही प्रशासनाच्या आणि कंत्राटदाराच्या दुर्लक्षामुळे ते मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन पत्रकार गणेश विठ्ठलराव पालवे यांनी केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे, तर जिल्हा प्रशासनाचेही दरवाजे ठोठावले आहेत. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित कंत्राटदाराला आदेश देण्यासाठी त्यांनी या निवेदनाच्या प्रतिलिपि (कॉपी) मा. मुख्य कार्यवाही अधिकारी (सी.ई.ओ.) जिल्हा परिषद परभणी, मा. कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) जिल्हा परिषद परभणी, आणि मा. गट विकास अधिकारी (बी.डी.ओ.) पंचायत समिती जिंतूर यांनाही पाठवून योग्य व तातडीच्या कार्यवाहीची मागणी केली आहे.जर संबंधित कंत्राटदाराला तातडीने आदेश देऊन हे अर्धवट राहिलेले काम युद्धपातळीवर पूर्ण केले नाही, तर गावातील पाण्याचा प्रश्न आणखी बिकट होईल. ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी महिलांना मैलोन्मैल भटकंती करावी लागत आहे. प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा काढून हंडी गावाला या पाणी संकटामधून मुक्त करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. आता यावर प्रशासन काय पाऊल उचलते आणि कंत्राटदाराला कधीपर्यंत काम सुरू करण्याचे आदेश देते, याकडे संपूर्ण हंडी गावासह परिसराचे लक्ष लागले आहे.

## चारठाण्यात अपर तहसील कार्यालय मंजूर; 'हा ऐतिहासिक निर्णय' - नानासाहेब राऊत



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर झाल्याने हा परिसराच्या विकासासाठी महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय असल्याचे मत माजी जिल्हा परिषद सदस्य नानासाहेब राऊत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. शासनाच्या निर्णयानंतर चारठाणा येथे नागरिकांनी आनंदोत्सव साजरा करत पेढे वाटून स्वागत केले.राऊत यांनी सांगितले की, चारठाणा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर होण्यासाठी राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींचे विशेष प्रयत्न झाले. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांची प्रशासकीय कामे सुलभ होणार असून शासनाच्या विविध सेवांचा लाभ अधिक वेगाने मिळणार आहे.चारठाणा व बोरी या दोन्ही गावांच्या प्रस्तावांचा विचार करण्यात आला होता. मात्र क्षेत्रफळ, लोकसंख्या, महसुली बाबी, अनुसूचित जमातींची संख्या तसेच ऐतिहासिक व भौगोलिक महत्त्व या निकषांवर चारठाण्याची निवड झाल्याचे राऊत यांनी स्पष्ट केले. चारठाणा हे ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव असून येथे प्राचीन मंदिरांचा मोठा ठेवा आहे. त्यामुळे प्रशासकीय दृष्टिकोनातूनही या गावाची निवड योग्य ठरल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान, बोरी येथे प्रस्तावित अपर तहसील कार्यालय मंजूर न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाविरोधात काही दिवसांपासून बाजारपेठ बंद ठेवून आंदोलन करण्यात येत असल्याची माहिती आहे. जिल्हा परिषद सदस्य अजय चौधरी, सरपंच आणि ग्रामस्थांनी शासनाकडे फेरविचाराची मागणी केली आहे.याबाबत प्रतिक्रिया देताना नानासाहेब राऊत म्हणाले, "बोरीच्या नागरिकांच्या भावना आम्हाला समजतात. बोरीलाही प्रशासकीय सुविधा मिळाव्यात, अशी आमचीही भूमिका आहे. मात्र चारठाण्याला मंजुरी मिळणे हा शासनाने निकषांवर घेतलेला निर्णय आहे. या प्रक्रियेत कोणत्याही गावावर अन्याय करण्याचा किंवा राजकीय हेतू ठेवण्याचा प्रश्न नाही."अपर तहसील कार्यालयाच्या निर्णयामुळे जिंतूर तालुक्यात राजकीय आणि सामाजिक पातळीवर चर्चा रंगली असली तरी चारठाणा येथे मात्र नागरिकांनी आनंदोत्सव साजरा करत शासनाचे आभार मानले. आता या कार्यालयाच्या प्रत्यक्ष कार्यान्वयनाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.